अपर तहसिलदार कार्यालय, औरंगाबाद
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, फाजिलपुरा, औरंगाबाद - 431001.

Email Id: addtahabd@gmail.com

वाचा :-

1. अर्जदार श्री. रामकृष्ण धनसिंग हरणे व इतर, रा. हर्सुल ता. जिल्हा औरंगाबाद यांचा अर्ज दिनांक 05.08.2022.
2. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ आध्यादेश क्रमांक 17 दिनांक 22.08.2014 चे कलम 42 - अ मधील पोट कलम (1) ते (4) मधील तरतुदी.
3. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एनए - 2016/प्र.क्र. - 209/टी-1 दिनांक 01.04.2017.
4. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय महसुल व वन विभाग क्रमांक एनएपी-2016/प्र.क्र 7/टी-1/मंत्रालय मुंबई दिनांक 22.01.2016 मधील तरतुदी.
5. मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे आदेश जा.क्र.2021/मशाका/जमीन-1/एनएपी-34/प्र.क्र.485 दिनांक 31.12.2021.
6. मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.2022/मशाका/जमीन-1/एनएपी-34/प्र.क्र.08 दिनांक 04.03.2022 व दिनांक 21.03.2022 रोजीच्या बैठकीतील निर्देश.
7. मा. प्रशासक, औरंगाबाद महानगर पालिका यांनी दिलेले बांधकाम परवाना क्रमांक 132/2022-23 फाईल क्रमांक 35/17/2021-22 दिनांक 29.07.2022 रोजीची परवानगी.
8. या कार्यालयाची टिपणी मंजुर दिनांक 17.08.2022.
9. शासकीय रक्कम शासन खाती जमा केल्याचा दिनांक 19.08.2022.

जा.क्र. 2022/जमा-2/परि.ब./सिअर- 279 **दिनांक** :- 23.08.2022.

परिशिष्ट ब

महाराष्ट्र जमीन महसुल संहिता 1966 च्या कलम - 42 अ मधील तरतुदीअन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे अशा जमीनीच्या भोगवटदारास दयावयाची सनद

ज्याअर्थी जिल्हा औरंगाबाद तालुका औरंगाबाद मौजे **हिमायत नगर** च्या सर्व्हे क्रं/ **गट क्रं**/न.भु.क्रं/सि.स.न. **24/5 पैकी मधील एकत्रित एकुण क्षेत्र 2000.00 चौ. मी. पैकी निवासी**/वाणिज्य/शैक्षणिक/अन्य **या प्रयोजनार्थ** या जमीनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसुल संहिता 1966 च्या कलम 42-अ च्या तरतुदींन्वये **मौजे हिमायत ,नगर** या **निवासी**/वाणिज्य/ शैक्षणिक/ अन्य अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमीनीचा विकास करण्यास मा. प्रशासक, औरंगाबाद महानगर पालिका यांनी दिलेले बांधकाम परवाना क्रमांक 132/2022-23 फाईल क्रमांक 35/17/2021-22 दिनांक 29.07.2022 रोजीची परवानगी अन्वये विकास/**बांधकाम** परवानगी प्राप्त केली आहे. त्या संबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजुर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे.

ज्याअर्थी उक्त जमीनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम 47-अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमुद अकषीक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम चालन क्रं MH00653981620222 3M **रक्कम रुपये 8,640/- (अक्षरी आठ हजार सहाशे चाळीस रुपये फक्त**) दिनांक 18.08. .2022 रोजी भरणा केली आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधीन राहुन उपरोक्त जमीनीच्या भोगवटादारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमीनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम 42-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

1. आकारणी : उक्त जमीनीचा भोगवटदारा उक्त जमीनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणीऐवजी वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासुन दिनांक 31 जुलै 2023 (वर्ष) रोजी संपणाऱ्या हमींच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रु. 0.72 पैसे **निवासी** प्रयोजनासाठी प्रति चौ. मी. या दराने परिगणीत होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकारी यांचे कडुन वेळोवेळी निश्चीत करण्यात येईल, अशी सुधारीत आकारणी देईल.
2. उक्त जमीनीचा भोगवटदार उक्त जमीनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर,दुर आणि उपकर भरील.
3. वरिल मंजुर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मंजुरीशिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मान्यतेने सदर जमीनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहीती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडुन मंजुर झाल्यापासुन 30 दिवासांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारावर बंधनकारक राहील.
4. उक्त जमीनीच्या भोगवटादाराने पुर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्या जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम 329 च्या पोट कलम (2) च्या अधीनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीनी भोगवटादार याच्या वहिवाटीत असल्याचे चालु ठेवता येईल.
5. अर्जदार यांना संबंधीत नियोजन प्राधीकरणाच्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

त्याची साक्ष म्हणुन **अपर तहसिलदार औरंगाबाद** या ठिकाणी **महाराष्ट्र राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा दिनांक** 23.08.2022 **रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.**

भोगवटादाराचे नाव **भोगवटादाराची स्वाक्षरी**

रामकृष्ण धनसिंग हरणे
व इतर

साक्षीदारांचे नावे **स्वाक्षऱ्या**

1. पंडित धनसिंग पचलोरे
2. सोनेराव गणी शेख

(विजय चव्हाण)
अपर तहसिलदार औरंगाबाद

आम्ही जाहिर करतो की, ज्याने या सनदेवर स्वत: म्हणुन स्वाक्षरी केलेली आहे ती, **श्री.** / श्रीमती **रामकृष्ण धनसिंग हरणे व इतर,** ही व्यक्ती तीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

साक्षीदारांचे नाव **स्वाक्ष-या**

1. पंडित धनसिंग पचलोरे
2. सोनेराव गणी शेख

प्रतिलीपी :-

1. मा जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्त्व सविनय सादर.
2. मा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. मा. प्रशासक, औरंगाबाद महानगर पालिका औरंगाबाद, यांना माहितीस्तव सविनय सादर.
4. अधिक्षक, भुमि अभिलेख, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
5. नगर भुमापन अधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्तव.
6. संबंधीत मंडळ अधिकारी / संबंधीत तलाठी, ता जि औरंगाबाद यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
7. संबंधीतास अर्जदार, श्री. रामकृष्ण धनसिंग हरणे व इतर, रा. हर्सुल ता. जिल्हा औरंगाबाद यांना माहितीस्तव.

(विजय चव्हाण)
अपर तहसिलदार औरंगाबाद
औरंगाबाद